# खेळणी

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**खेळणी : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २२०/-

# खेळणी

# १

रात्री आठ वाजता येऊन पोचणारी ती गाडी 'रेशमबाग' स्टेशनाच्या अलीकडील 'नाचणी' नदीवरील मोठ्या पुलावरून चमत्कारिक घोंघावणारा आवाज करीत आस्ते आस्ते सरकू लागली, तेव्हा खिडक्या खिडक्यातून शेकडो माणसं झुकून बाहेर वाकली; आणि खालच्या पाण्यावरची गाडीची लांबट सावली आणि त्या सावलीला मधून मधून पडलेल्या भोकांप्रमाणे प्रकाशाची चौकोनी प्रतिबिंबं पाहता पाहता त्यांनी जेव्हा सहज उजवीकडे माना वळविल्या, तेव्हा ती सारी माणसं विलक्षण चकित झाली. 'रेशमबाग' स्टेशनाच्या आवारात आपली गाडी शिरणार आहे की दुसऱ्याच एखाद्या असा भ्रम त्यांना क्षणभर पडला.

या गाडीनं येणाऱ्या प्रवाशाच्या नजरेला नाचणीच्या पुलावरून नेहमी दिसणाऱ्या गोष्टी म्हणजे रेशमबाग स्टेशनापासून नजीक असलेल्या खेळण्यांच्या कारखान्यांतले दिवे, आणि कारखान्याच्या मुख्य इमारतीवर उभी केलेला झगझगीत 'निऑन' नळ्यांनी रेखलेली, फुगा उडविणाऱ्या गोंडस बालकाची गडद अस्मानी रंगाची मोहक आकृती! प्रत्यक्ष स्टेशनावर सात आठ घासलेट दिव्यांचा आणि एकुलत्या एका गॅसबत्तीचा बेताचाच उजेड दुरून दिसायचा. पण खिडक्यांवाटे बाहेर झुकलेल्या लोकांच्या दृष्टीला आज काही निराळाच प्रकार दिसला. स्टेशनाचं सबंध आवार रंगीबेरंगी विद्युत्‌दीपांनी पेटल्यासारखं त्यांना भासलं. 'आ:!' असा उद्‌गार त्यांच्या तोंडून बाहेर पडला.

त्यांच्यापैकी कित्येकजण तोंड खिडकीबाहेरच ठेवून आतल्या उतारूंना म्हणाले, 'आरं या या, बघा तरी! ठ्येसनावर लई मोठी आरास केलीया!' ते ऐकताच आतले लोक खिडक्यांकडे धावले. एकेका खिडकीतून दहा दहा डोकी बाहेर निघाली. मघाच्याहून दसपट मोठा 'आ:!' असा उद्‌गार हवेत उठला. आणि दुसऱ्याच क्षणी आता स्टेशनाच्या यार्डाजवळ आलेल्या गाडीतल्या त्या लोकांच्या कानावर स्वर पडले, तेव्हा त्याचं आश्चर्य शतपटीनी वाढलं. 'कुणाचं लगनबिगीन हाये का काय तरी!' ते एकमेकांना म्हणाले. त्यांची उत्सुकता अगदी कळसाला पोचली. गाडी प्लॅटफॉर्मवर आल्याबरोबर ती उभी राहण्याची वाट न पाहता त्यांनी पटापट खाली उड्याच टाकल्या. पण त्यांना तसं करता येण्यासारखं नव्हतं. प्लॅटफॉर्मवर लोकांची इतकी खेचाखेच उडाली होती, की नव्या माणसाला पाऊल ठेवायला जागा नव्हती. ज्यांना या स्टेशनावर उतरायचं होतं त्यांना गाडीपर्यंत पोचण्यासाठी आरडाओरडा आणि धक्काबुक्की करू लागले. उतरू-चढू पाहणाऱ्या या प्रवाशांना कळेना आज रात्री स्टेशनावर बँड कशासाठी वाजत होता, रोषणाई का झाली होती, ही एवढी गर्दी कशासाठी झाली होती....

पण हा गोंधळ फार वेळ टिकला नाही. 'इकडे इकडे! अरे या डब्यात आहेत!' अशा आरोळ्या कुणी तरी मारल्या, आणि त्याबरोबर पाण्याच्या लोंढ्याला बांध घालताच त्याची दिशा बदलावी त्याप्रमाणे प्लॅटफॉर्मवरची ती गर्दी एकदम हालली, आणि फर्स्ट क्लासच्या डब्याकडे वेगानं गेली. गाडीत चढून बसणाऱ्या लोकांना वाट मिळाली. उतरणारेही उतरले, पण त्यांच्यापैकी बहुतेकजण स्टेशनाबाहेर पडून घराच्या वाटेला लागण्याऐवजी आता फर्स्ट क्लासच्या डब्यापुढे एकत्रित झालेल्या त्या गर्दीच्या काठाशी भिडले, टाचा उचलून आणि माना उंचावून पाहण्याची खटपट करू लागले, 'हाये तरी काय कळंना!' असं एकमेकांत पुटपुटू लागले...

सुमारे वीस वर्षांची एक तरुण मुलगी प्लॅटफॉर्मच्या दगडी फरशीवर पायातल्या सँडल्सच्या उंच टाचांचे खाड् खाड् आवाज करीत धावत आली, आणि गर्दीच्या त्या अभेद्य भिंतीपाशी येताच तिला थांबावं लागलं तेव्हा तिचा चेहरा अगदी रडकुंडीस आल्यासारखा झाला. 'आता काय करावं' असं स्वत:शीच पुटपुटल्याप्रमाणे तिच्या ओठांची हालचाल झाली. तिनं गर्दीच्या काठावर उभ्या असलेल्या माणसांकडे न्याहाळून पाहिलं, परंतु त्या माणसात एकही ओळखीचा चेहरा तिला दिसला नाही



तेव्हा ती भांबावून गेली. त्या दाटीत घुसून वाट काढणं तिला जमण्यासारखं नव्हतं. क्षणभर हताश चेहरा करून ती जागच्या जागी उभी राहिली; पण मग असं उभं राहून कसं चालेल. पुढे जायलाच हवं असा विचार मनात आल्यामुळं गर्दीच्या कडेवरच्या अनोळखी माणसांना उद्देशून अगदी काकुळतीच्या स्वरात ती म्हणाली, 'मला थोडी वाट द्या हो.' तिच्या शब्दांकडे कुणी लक्ष दिलं नाही, म्हणून तिनं ते पुन्हा उच्चारले. एक दोघां माणसांनी वळून तिच्याकडे पाहिलं, तेव्हा तिनं त्या शब्दांचा आणखी एकदा उच्चार केला. परंतु ती काय म्हणत होती त्याकडे लक्ष देण्याऐवजी त्यांनी तिलाच उलट विचारलं, 'काय हाये तरी काय हो?' त्यांच्या त्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी ती तरुण मुलगी आर्जवाच्या स्वरात पुन्हा म्हणाली, 'जरा बाजूला सरकता का दादा? मला जाऊ द्या ना पुढे.' परंतु तिची ती विनंती त्या दोघां इसमांना पटली नाही. 'हं: मागुनशान् येऊन म्होरं जायचं म्हनता? वा! आमीबी बघायसाठीच उभं राहिलो नव्हं का? आमच्या मागच्या बाजूस रांग धरून राव्हा की उभ्या.' त्या माणसाचं ते उत्तर ऐकल्यावर ते बाजूला वाट देणार नाहीत याबद्दल त्या तरुण मुलीची खात्रीच पटली. 'अहो पण...' असे शब्द तिच्या तोंडून अर्धवट बाहेर पडले, परंतु ते वाक्य तिनं पुरं केलं नाही. आता या गर्दीच्या बाहेरच्या बाजूस आपल्याला असंच उभं राहावं लागणार हा विचार तिच्या मनाला असह्य झाला असावा, असं तिच्या चर्येवरून दिसलं. हात एकमेकांवर चोळीत एखाद्या असहाय पाखराप्रमाणे तिनं इकडेतिकडे पाहिलं. लोकांची जी खेचाखेच उडाली होती तिच्यामुळे तिनं टाचा कितीही उंच करून पाहिल्या तरी तिला पलीकडचं काही दिसणं शक्य नव्हतं. लोकांच्या अंगाच्या आणि डोक्यांच्या फटीफटीतून जे काही दिसेल तेवढ्यावरच समाधान मानणं तिला भाग होतं. आणि अशा प्रकारे तिला जे दिसत होतं ते तिच्या समाधानाला अगदीच अपुरं होतं. स्टेशनावर यायला आपल्याला असा उशीर व्हावा याचा तिला मनस्वी खेद झाला. कारखान्यातल्या इतर साऱ्या लोकांप्रमाणे आज रात्रीच्या त्या घटकेची तिनं गेले तीन दिवस सतत वाट पाहिली होती. आता दोन दिवस उरले, एक दिवस उरला, बारा तास उरले, चार घटकाच राहिल्या अशा प्रकारे तिनं मनाशी घटका पळं मोजली होती. कदाचित् कारखान्यातल्या इतर कुणाही माणसानं मोजली नसतील इतक्या अधीरपणानं तिनं ती मोजली होती. आज रात्रीच्या या घटकेचा ध्यास धरून तिनं तीन दिवस काढले होते. आणि असं असून अखेर

आयत्या वेळेस तिला उशीर झाला होता. आता तिला पुढं घुसता येणं शक्य नव्हतं. गर्दीच्या जाळीतून जेवढं दिसेल तेवढ्यावर संतुष्ट राहाणं तिला भाग होतं... एकीकडे ती समोर नजर लावून दिसेल तेवढं बघत होती, आणि दुसरीकडे ती मनातल्या मनात स्वत:वर जळफळत होती. डोळ्यावाटे बाहेर पडणारे अश्रू आवरीत होती....

परंतु तितक्यात आपल्याला कुणीतरी हाक मारली असं तिला वाटलं. तिनं वळून पाहिलं तो स्टेशनमास्तर तिच्यापुढे उभे होते, व ते तिला म्हणत होते, 'हॅलो! रत्ना! हे गं काय? तू अशी मागं काय उभी राहिलीस?' त्यांना पाहताच रत्नाला एकदम धीर आला. ती त्यांना म्हणाली, 'मला यायला उशीर झाला आणि आता मला पुढे जाता येत नाही. या लोकांची मी विनवणी केली, पण ते काही मला वाट देत नाहीत बघा.' 'असं?' असा उद्‌गार काढून स्टेशनमास्तर हसले, आणि आवाज उंच करून ते खेकसले, 'ए! चला हटा!' त्यांचे ते शब्द ऐकल्याबरोबर गर्दीच्या काठावरची माणसं एकदम हालली. स्टेशनमास्तरांना पाहताच त्यांना वाटलं, तिकिटं दाखवली पाहिजेत. ज्यांनी तिकिटं हाताच्या मुठीत धरून ठेवली होती त्यांनी ती झटाझट पुढे केली, बाकीच्यांनी तिकिटं काढायसाठी कुडत्यांच्या खिशात अथवा मुंडाशात हात घातले. पण त्यांची ती तारांबळ पाहून मास्तर फक्त हसले आणि म्हणाले, 'तिकिटं राहू द्या बेट्यांनो; आधी वाट सोडा पाहू! व्हा दूर!' तिकिटवाले लोक तर दूर झालेच, परंतु मास्तरांचे ते खणखणीत शब्द ऐकून गर्दीतल्या बाकीच्या लोकांनी देखील माना वळविल्या, आणि मास्तरांना व रत्नाला पाहताच त्यांनी चटकन् वाट दिली. रत्नाचा उजवा दंड आपल्या डाव्या हातानं पकडून मास्तर पुढे पावलं टाकू लागले. त्यांच्याबरोबर जाता जाता हनुवटी थोडीशी वर झुकवून हसत हसत रत्ना त्यांना म्हणाली, 'तुम्ही अगदी थाटबाज पोषाख केला आहे आज!' मास्तर हसले व म्हणाले, 'केलाच पाहिजे. आजचा हा आनंदाचा प्रसंग काय मामुली आहे?' रत्नानं काही बोलण्याऐवजी मान हलविली, आणि ती हसली. मास्तरांच्या त्या उद्‌गारात कारखान्यातल्या साऱ्या लोकांच्या गेल्या तीन दिवसांतल्या अत्यानंदाच्या भावना प्रतिबिंबित झाल्या होत्या असं तिला वाटलं.

खेळण्याच्या कारखान्याचे तरुण मालक विजयकुमार अमक्या दिवशी अमक्या गाडीनं येणार असं कळल्यापासून कारखान्यात आनंदाची केवढी लाट उसळली होती. 'आपले साहेब येणार' ही एकच आनंदाची बातमी जो तो दुसऱ्याला सांगू



लागला होता. विजयकुमाराच्या जंगी स्वागताचे बेत जनरल मॅनेजरच्या खोलीत ऑफिसर लोकांच्या सभा भरून पक्के होऊ लागले होते, आणि त्या सभांत जे जे ठरत होतं त्याच्या नोटिसा कारखान्याच्या बोर्डावर एकामागून एक लागू लागल्या होत्या. छोट्या छोट्या समित्या बनविण्यात आल्या होत्या, व त्या त्या समित्यांचे सभासद आपापल्या कामाला मोठ्या उत्साहानं लागले होते. वियजकुमार स्टेशनावर दाखल होतील तेव्हा तिथे मोठी रोषणाई झाली पाहिजे, आणि बँड वाजला पाहिजे असा बेत ठरल्याबरोबर त्या समितीचे लोक कामाला लागले होते. घाईघाईनं मुद्दाम बनविलेले शोभिवंत खांब प्लॅटफॉर्मवर उभे करण्यात आले होते, एक भव्य कमान बनविण्यात आली होती. या साऱ्यांवर विजेचे दिवे बसविण्यात आले होते, रोषणाई कशी काय साधली ते पाहण्यासाठी तिची रंगीत तालीमही घेण्यात आली होती. कारखान्याच्या साऱ्या इमारती दिव्यांनी शृंगारण्यात आल्या होत्या. विजयकुमारांच्या बंगल्याची रोषणाई तर विशेष कसोशीनं करण्यात आली होती. या समितीनं अवघ्या तीन दिवसांत आपली कामगिरी चोखपणानं पार पाडली होती. इतर समित्याही एकमेकीत स्पर्धा लागल्याप्रमाणे आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडीत होत्या. कारखाना नेहमीप्रमाणे चालूच राहिला होता, परंतु लोकांचं सारं लक्ष स्वागतसमारंभाची जय्यत तयारी करण्याकडे लागलं होतं. विजयकुमारचं स्वागत अगदी अपूर्व झालं पाहिजे असं जनरल मॅनेजर शिरगावकर यांच्यापासून कचेरीची झाडलोट करणाऱ्या म्हादूपर्यंत साऱ्यांना वाटत होतं. विजयकुमारांवर साऱ्या कामगारांची असामान्य भक्ती होती; आणि शिवाय सर्वांचे आवडते 'साहेब' परत येत होते ते नेहमीप्रमाणे कारखान्याच्या कामासाठी दिल्लीस जाऊन प्रवास संपवून येत नव्हते, तर लग्न करून दहा दिवसांच्या मधुचंद्रानंतर आपल्या पत्नीसह येत होते! कारखान्याच्या इतिहासातला हा एक अपूर्व आनंदाचा प्रसंग होता...

विजयकुमारांचा विवाह अचानक झाल्यामुळे लोकांचा आनंद आणखीच वाढला होता. विजयकुमारांनी आता लग्न करायला हवं असं साऱ्यांना किती दिवस तरी वाटत होतं, आणि ते लग्न करीत नाहीत हे पाहून त्यांना आश्चर्य आणि खेदही वाटत असे. त्यामुळे दिल्लीस साहेबांचं लग्न झालं ही बातमी कारखान्यातल्या कामगारांना जेव्हा प्रथम कळली तेव्हा या घटनेची आपल्याला आधी काहीसुद्धा कल्पना नसावी याबद्दल त्यांना साहेबांचा थोडा राग आला. इतक्या दूरच्या परदेशातील

एका मुलीशी त्यांनी लग्न करावं ही गोष्ट त्यांच्यापैकी पुष्कळांना जरा चमत्कारिक वाटली. परंतु हे दोन्ही विचारतरंग क्षणिक होते. काही का असेना, आपल्या साहेबांनी लग्न केलं ही फार सुंदर गोष्ट झाली असा आनंदाचा विचारच सगळ्या लोकांच्या अंत:करणात उचंबळून आला. साहेब काश्मीरमधला मधुचंद्र संपवून येणार हे कळल्यापासून त्यांच्या स्वागताचा थाट असा काही उडवून दिला पाहिजे की ते तर खुष झाले पाहिजेतच, पण प्रथमच रेशमबागला येणारी त्यांची दिल्लीची पत्नीदेखील अगदी चकित होऊन गेली पाहिजे, अशा विचारानं सारे लोक स्वागताच्या तयारीला लागले होते आणि नाना प्रकारची तयारी करता करता आपल्या साहेबांच्या बायकोला चकित आणि आनंदित करून टाकलं पाहिजे, या महत्त्वाकांक्षेप्रमाणेच एक गोड उत्सुकताही प्रत्येकाच्या मनात उद्‌भवली होती. आपल्या साहेबांची बायको आपल्याला एकदा प्रत्यक्ष केव्हा पाहायला मिळते असं सगळ्यांना झालं होतं. विजयकुमारांनी दिल्लीच्या एका मुलीशी लग्न केलं एवढीच बातमी कारखान्यातल्या लोकांना कळली होती. विवाहाचा तपशील कुणालाच ठाऊक नव्हता. तथापि हा प्रेमविवाह असला पाहिजे हे सगळ्यांना सहज ओळखता येण्यासारखं होतं. जिच्यावर विजयकुमारांचं प्रेम जडलं ती स्त्री रूपानं आणि गुणांनी असामान्य असली पाहिजे हे देखील उघडच होतं. अशा त्या स्त्रीला केव्हा एकदा प्रत्यक्ष पाहू असं कारखान्यातल्या साऱ्या लोकांना वाटावं हे साहजिक होतं. आपले साहेब जसे देखणे, मनमिळाऊ प्रेमळ आणि कर्तृत्ववान आहेत तशीच त्यांनी निवडलेली बायकोही देखणी आणि गुणी असणार अशीच सगळ्यांची खात्री होती. कारखान्यातल्या साऱ्या लोकांनी विजयकुमारांवर सतत प्रेम केलं होतं. त्यांच्या प्रेमात आता एक वाटेकरीण विजयकुमार घेऊन येणार होते. तिला पाहण्याच्या आधीच साहेबांप्रमाणेच तिच्यासाठीही आपल्या प्रेमाची आणि भक्तीची ओंजळ घेऊन लोक तयार होतं. परंतु जिच्याबद्दल त्यांच्या सद्‌भावना अशा प्रकारे आधीच तयार होत्या ती साहेबांची बायको आणि कारखान्याची नवी मालकीण आपल्या डोळयांना प्रत्यक्ष केव्हा एकदा दिसते अशी अधीरता कारखान्यातल्या लोकांना गेले तीन दिवस वाटत राहिली होती....

गाडी उभी राहिली, फर्स्टक्लासच्या डब्यासमोर गर्दी जमा झाली. जनरल मॅनेजर विनायकराव शिरगावकर आणि इतर ऑफिसर्स हारतुरे घेऊन सज्ज झाले, तेव्हा तर साऱ्या लोकांच्या मनातल्या या अधीरतेला सीमाच उरली नाही. साऱ्यांचे



डोळे डब्याच्या दाराकडे लागून राहिले. क्षणभरानं विजयकुमार दाराच्या चौकटीत येऊन उभा राहिलेला लोकांना दिसला. त्याला पाहताच लोकांनी टाळ्यांचा गजर केला, परंतु त्यांचे समाधान झालं नाही. साहेबांपेक्षा साहेबांची बायको पाहाण्यास ते अधिक उत्सुक होते. त्यांनी एकमेकांकडे पाहिलं, ते अशा अर्थानं की अरेच्या, अजून मालकीणबाई दारात कशा दिसत नाहीत? परंतु त्यांना फार वेळ वाट पाहावी लागली नाही. विजयकुमार खाली उतरला, आणि त्याच्या मागोमाग एक तरुण स्त्री दाराशी आलेली त्यांना दिसली. तिला पाहताच डब्यापुढे जमलेल्या त्या शेकडो लोकांना आनंदापेक्षाही आश्चर्य अधिक वाटलं. असं अपूर्व सौंदर्य आपल्या दृष्टीस पडेल अशी त्यांची कल्पना नव्हती! किंचित् निळसर रंगाची उंची साटणीची पायघोळ पंजाबी सलवार, मधून मधून जरीचे नाजूक बुंद ज्यावर होते असा उंची तलम रेशमी जवळ जवळ गुडघ्याला टेकलेला त्याच रंगाचा शर्ट, वक्षभागावरून दोन्ही खांद्यांवर ज्याची टोकं टाकलेली होती असा गडद डाळिंबी रंगाचा दुपट्टा, पायात ज्यावर कलाबतूचं काम केलं होतं असा पंजाबी चढाव, अशा वेषातली, मानेवर रूळणाऱ्या काळ्याभोर केसांच्या सैल गाठीवरची गुलाबाची फुलं डाव्या तळव्यानं हळूच नीट करणारी ती गोरीपान तरुण मुलगी पाहून त्या लोकांना क्षणभर वाटलं, 'काय, आमच्या साहेबांची ही बायको?' तिच्या असामान्य रूपामुळे ती फार नाजूक दिसत होती, की तिच्या विलक्षण नाजूकपणामुळे तिचं लावण्य आणखीच नजरेत ठसत होतं हे सांगणं खरोखरच कठीण होतं. तिच्या वेषभूषेची तऱ्हा पंजाबी असल्यामुळे ती काहीशी परकी म्हणून अलौकिक वाटत होती; परंतु शिवाय तिच्या गोऱ्यापान अवयवांची कांति, तिच्या मुद्रेवरचा किंचित् बावरल्यासारखा परंतु आनंदाचा भाव, आणि तिच्या देहलतेचा अतीव नाजूकपणा, यांच्या योगानं जणू काही दुसऱ्याच कुठल्या तरी स्वप्नलोकांतून ती येथे चुकून आली आहे असं तिच्याकडे पाहणाऱ्याला वाटण्यासारखं होतं. साहेबांची बायको देखणी असणारच अशी साऱ्यांनी आधीच कल्पना केलेली होती. परंतु कुणाच्याही कल्पनेनं न काढलेलं असं ते अलौकिक सौंदर्याचं चित्र आता डब्याच्या दारात उभं राहिलेलं प्लॅटफॉर्मवरच्या दिव्यांच्या झगझगाटांनी आणखीच उजळून निघालेलं त्यांच्या दृष्टीस पडत होतं. आनंदापेक्षाही आश्चर्यानं साऱ्या लोकांची अंत:करणं तुडुंब भरली. डब्यापुढे गर्दी करून उभे राहिलेले ते शेकडो लोक डब्याच्या दारात उभ्या राहिलेल्या त्या स्त्रीकडे अनिमिष नेत्रांनी पाहात